# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेसनोट   दि. १२/१०/२०२१

### ४४,००,०००/- रु. किं.ची. आर.टी.ओ. रजिस्टर न झालेली नवीन फोर्चुनर कार चोरणाऱ्या चोरटयास कार विक्रीच्या प्रयत्नात असताना गुंडा विरोधी पथकाकडुन अटक

दिनांक.१२/१०/२०२१ रोजी मा.श्री.कृष्ण प्रकाश सो.पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांना त्यांचे गुप्त बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, बेंगलोर, कर्णाटक येथे चोरलेली नवीन फोर्चुनर कार विक्री करणे करीता इंदीरा कॉलेजजवळ, बँगलोर मुंबई हायवे ताथवडे, पुणे येथे येणार आहे, वगैरे मजकुराची बातमी मिळताच मा. श्री. मंचक इप्पर सो. पोलीस उप आयुक्त सो.परिमंडळ १, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली इंदीरा कॉलेजजवळ, बँगलोर मुंबई हायवे ताथवडे, पुणे येथे सापळा रचुन इसम नामे चेतन बसवराज म्हेत्रे, वय २६ वर्षे, रा. विरभद्रेश्वर मंदीराजवळ, भातब्रा, ता. भालकी, जि. बिदर राज्य कर्णाटक यास शिताफिने ताब्यात घेवुन त्याचे कब्जातुन **४४,००,०००/- किं.रु. टोयोटा किर्लोस्कर कंपनीची फोर्चुनर कार** पांढरे रंगाची ,आरटीओ नंबर नसलेली व मॉडेल नं. GUN166R-SXTHXX ही जप्त करण्यात आली असुन सदर कार चोरी बाबत राममुर्तीनगर पोलीस ठाणे, बेंगलोर, राज्य कर्णाटक गु.र.नं. ३८३/२०२१ भा.द.वि.क. ३७९ प्रमाणे गुन्हा नोंद असुन सदर आरोपी व फोर्चुनर कार राममुर्तीनगर पोलीस ठाणे, बेंगलोर, राज्य कर्णाटक येथील पोलीसांच्या ताब्यात रिपोर्टाने देण्यात आली आहे.

सदरची कारवाई ही मा.श्री.कृष्ण प्रकाश सो.पोलीस आयुक्त, मा.डॉ.श्री.संजय शिंदे सो.अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. आनंद भोईटे सो. पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मंचक इप्पर सो. पोलीस उप आयुक्त सो.परिमंडळ १,मा.श्री. प्रशांत अमृतकर सो. सहा पोलीस आयुक्त (गुन्हे-१)यांचे मार्गदर्शनाखाली गुंडा विरोधी पथकाचे सहायक पोलीस निरीक्षक एच.व्ही.माने, पोलीस अंमलदार -हजरत पठाण, प्रविण तापकिर, गंगाराम चव्हाण, विजय तेलेवार, गणेश मेदगे, रामदास मोहीते, शुभम कदम व ज्ञानेश्वर गिरी यांनी केली आहे.